मराठी
न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल



बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२




# पावसाळ्यापूर्वी नालेसफाईची कामे वेळेत पूर्ण करा : आयुक्त डॉ.विजय सुर्यवंशी

## स्वच्छ सर्वेक्षण 2026 च्या अनुषंगाने आरोग्य विभागाच्या आढावा बैठकीत आयुक्तांचे निर्देश



**पिंपरी | प्रतिनिधी**

पावसाळ्याच्या पार्श्वभूमीवर शहरातील नालेसफाईची कामे वेळेत, नियोजनबद्ध आणि गुणवत्तापूर्ण पद्धतीने पूर्ण करण्याचे निर्देश आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिले. तसेच सार्वजनिक स्वच्छतेच्या कामात कोणताही हलगर्जीपणा होऊ नये, यासाठी आरोग्य विभागाने सातत्याने आढावा घ्यावा, असेही त्यांनी स्पष्ट केले.

महापालिकेच्या मुख्य प्रशासकीय इमारतीत झालेल्या आरोग्य विभागाच्या आढावा बैठकीत ते बोलत होते. या वेळी अतिरिक्त आयुक्त, सहआयुक्त, अभियंते तसेच विविध विभागांचे अधिकारी उपस्थित होते. स्वच्छ सर्वेक्षण २०२६च्या अनुषंगाने शहरातील स्वच्छता, नालेसफाई आणि पर्यावरणपूरक उपक्रमांचा सविस्तर आढावा घेण्यात आला.

या बैठकीस अतिरिक्त आयुक्त विजयकुमार खोराटे, तृप्ती सांडभोर, विक्रांत बगाडे, सह आयुक्त मनोज लोणकर, मुख्य अभियंता संजय कुलकर्णी, प्रमोद ओंबासे, सह शहर अभियंता बापू गायकवाड, आरोग्य वैद्यकीय अधिकारी डॉ. लक्ष्मण गोफणे, सह अभियंता बापू गायकवाड, अनिल भालसाखळे, उप आयुक्त डॉ. प्रदीप ठेंगल, सचिन पवार, अण्णा बोदडे, पंकज पाटील, व्यंकटेश दुर्वास, सीताराम बहुरे, नगर सचिव मुकेश कोळप, सहायक आयुक्त तानाजी नरळे, अमित पंडित, किरणकुमार मोरे, क्षेत्रीय अधिकारी अजिंक्य येळे, राजाराम सलगर, निवेदिता घार्गे, पूजा दूधनाळे, अतुल पाटील, राजाराम सलगर, किशोर ननवरे, मुख्य उद्यान अधीक्षक महेश गारगोटे यांच्यासह महापालिका अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते.

आयुक्त सूर्यवंशी म्हणाले, पावसाळ्यात नाले तुंबणे किंवा पाणी साचणे टाळण्यासाठी सर्व यंत्रणांनी सजग राहणे गरजेचे आहे. नालेसफाई केवळ पूर्ण करणे नव्हे, तर ती गुणवत्तापूर्ण पद्धतीने आणि वेळेत पूर्ण होणे आवश्यक आहे. नागरिकांना दिलासा देणे हे प्रशासनाचे प्राथमिक उद्दिष्ट असावे, असे त्यांनी सांगितले.

शहरातील १४५ नाल्यांपैकी सुमारे ४७.३४ टक्के साफसफाई पूर्ण झाल्याची माहिती आरोग्य विभागाने दिली. विविध क्षेत्रीय कार्यालयांमध्ये कामाला गती देण्यात येत असून उर्वरित कामे लवकर पूर्ण करण्यासाठी प्रयत्न सुरू आहेत.

दरम्यान, नाल्यांच्या प्रवाहात अडथळा निर्माण करणाऱ्या अनधिकृत बांधकामांवर कडक कारवाई करण्याचे आदेश देण्यात आले. तसेच अनधिकृत नळजोड, ओव्हरहेड वायर, अतिक्रमण, होर्डिंग्ज व बॅनर यांवरही कठोर कारवाईचे संकेत देण्यात आले.

याशिवाय 'झिरो वेस्ट स्लम', 'झिरो वेस्ट स्कूल' आणि 'आरआरआर सेंटर' सारख्या उपक्रमांद्वारे शहर अधिक स्वच्छ आणि पर्यावरणपूरक करण्यावर भर देण्यात येत आहे. नागरिकांचा सहभाग वाढवून स्वच्छतेच्या उपक्रमांना बळकटी देण्याचे आवाहनही यावेळी करण्यात आले.

# महात्मा फुले व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त छायाचित्र प्रदर्शन

## महात्मा फुले व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवनप्रवासाचे दुर्मिळ छायाचित्रांतून प्रभावी दर्शन



**पिंपरी | प्रतिनिधी**

क्रांतिसूर्य महात्मा जोतीराव फुले यांच्या द्विशताब्दी जयंती वर्षानिमित्त तसेच महामानव भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंतीनिमित्त पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने 'सामाजिक समता सप्ताह' आणि 'विचार प्रबोधन पर्व २०२६' अंतर्गत विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.

या कार्यक्रमांच्या अनुषंगाने पिंपरी येथील सावित्रीबाई फुले स्मारक येथे दि.११ ते १५ एप्रिल २०२६ या कालावधीत क्रांतिसूर्य महात्मा फुले आणि भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवनातील दुर्मिळ, ऐतिहासिक आणि प्रेरणादायी छायाचित्रांचे विशेष प्रदर्शन भरविण्यात आले आहे. या प्रदर्शनासाठी छायाचित्रांचा मौल्यवान संग्रह दिलीप वानखेडे, स्मृती नागार्जुन संग्रहालय आणि अश्विनी डोके यांच्याकडून उपलब्ध करण्यात आला आहे.

या प्रदर्शनामध्ये क्रांतिसूर्य महात्मा जोतीराव फुले यांच्या आयुष्याचा संघर्षमय आणि परिवर्तनशील प्रवास प्रभावीपणे उलगडणारी छायाचित्रे सादर करण्यात आली आहेत. महात्मा फुले वाडा व त्यातील विवि ध वास्तूंचे दृश्य, जोतीराव आणि सावित्रीबाई फुले यांच्या विवाह सोहळ्याचे क्षण, मुलींच्या शिक्षणासाठी सुरू केलेल्या पहिल्या शाळेतील अध्यापनाचे दृश्य, सावित्रीबाई फुले यांच्या वास्तव्याचे अवशेष, तसेच फुले दांपत्याच्या कार्याला प्रेरणा देणाऱ्या व्यक्तींची छायाचित्रे यामधून त्या काळातील सामाजिक वास्तव आणि त्यांच्या क्रांतिकारी कार्याची झलक अनुभवता येते. त्यांच्या विविध भाषांतील हस्ताक्षरांमधून त्यांच्या विद्वत्तेची आणि विचारांची व्यापकता अधोरेखित होते. अशा अनेक दुर्मिळ, ऐतिहासिक आणि प्रेरणादायी छायाचित्रांचा समृद्ध संग्रह या प्रदर्शनात पाहायला मिळत आहे.

तसेच भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवनातील महत्त्वपूर्ण आणि ऐतिहासिक क्षण टिपणारी छायाचित्रे या प्रदर्शनाचे विशेष आकर्षण ठरत आहेत. विविध सामाजिक आणि राजकीय सत्याग्रह, कोल्हापूरसह विविध ठिकाणच्या ऐतिहासिक भेटी, भारतीय राज्यघटनेची निर्मिती करतानाचे दुर्मिळ क्षण, घटना समितीच्या कामकाजातील सहभाग, मंत्रिपदाची शपथ घेतानाचे प्रसंग तसेच त्यांच्या कुटुंबीयांसोबतचे भावनिक क्षण अशा अनेक छायाचित्रांच्या माध्यमातून त्यांच्या बहुआयामी व्यक्तिमत्त्वाची सखोल ओळख होते.

नव्या पिढीने या महान विभूतींच्या कार्याचा वारसा समजून घेण्यासाठी आणि समाजप्रबोधनासाठी या प्रदर्शनाला मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन पिंपरी चिंचवड महानगरपालिकेतर्फे करण्यात आले आहे.

# महाराष्ट्र धन्वंतरी गौरव पुरस्काराने मोशीतील 'विठ्ठल'हॉस्पिटलचा सन्मान

## किडनी तज्ञ डॉ. शंकर मुंडे, डॉ भाग्यश्री लहाने मुंडे, डॉ. गणेश मुंडे, यांनी मान्यवरांच्या हस्ते स्वीकारला पुरस्कार





**पिंपरी | प्रतिनिधी**

आरोग्यसेवा ही केवळ एक व्यावसायिक सेवा नसून ती खऱ्या अर्थाने माणुसकीचा धर्म जपणारी एक मोठी जबाबदारी आहे, हे आपल्या कार्यातून सिद्ध करणाऱ्या मोशी येथील विठ्ठल मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटला आणि त्यांच्या टीमला 'महाराष्ट्र धन्वंतरी गौरव' पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे. किडनी तज्ञ डॉ. शंकर मुंडे, डॉ भाग्यश्री लहाने मुंडे, डॉ. गणेश मुंडे, यांनी मान्यवरांच्या हस्ते पुरस्कार स्वीकारला.

एक्सप्रेस मीडिया एंटरप्राइजेस आणि रमामंगल फाऊंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित एका दिमाखदार सोहळ्यात त्यांना हा बहुमान प्रदान करण्यात आला. या सोहळ्याला ज्येष्ठ अभिनेते मकरंद अनासपुरे,'अॅल्युमिनियम मॅन ऑफ इंडिया' अशी ख्याती असलेले सुप्रसिद्ध उद्योजक भरत गीते, खासदार श्रीरंग बारणे, महापौर रवी लांडगे, एक्सप्रेस मीडिया एंटरप्राइजेसच्या संचालिका मनिषा थोरात-पिसाळ, वैभव थोरात, रमामंगल फाऊंडेशनचे संचालक संतोष सौंदणकर, कविता अल्हाट, सुलभा उबाळे, अनंत कोऱ्हाळे आणि सुनील काकडे यांसह विविध क्षेत्रांतील मान्यवर उपस्थित होते.

मोशी आणि परिसरातील नागरिकांच्या आरोग्याची धुरा विठ्ठल मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटलने अत्यंत समर्थपणे पेलली असून, आजच्या खर्चिक वैद्यकीय युगात हे रुग्णालय सर्वसामान्यांसाठी विश्वासाचे केंद्र बनले आहे. अत्याधुनिक तंत्रज्ञान, अनुभवी डॉक्टरांची फळी आणि रुग्णांप्रती असलेली संवेदनशीलता यांच्या जोरावर या रुग्णालयाने अल्प काळात आरोग्यसेवेचा एक आदर्श मानदंड प्रस्थापित केला आहे. आंतरराष्ट्रीय दर्जाच्या पायाभूत सुविधा असलेल्या या रुग्णालयात सामान्य आजारांपासून ते किडनी विकार, क्रिटिकल केअर आणि मणक्यांच्या गुंतागुंतीच्या शस्त्रक्रियांपर्यंत सर्व उपचार एकाच छताखाली उपलब्ध आहेत.

विशेषतः डॉ. भाग्यश्री लहाने-मुंडे (एमडी मेडिसिन), किडनी तज्ज्ञ डॉ. शंकर मुंडे आणि अस्थिरोग तज्ज्ञ डॉ. गणेश मुंडे यांच्या मार्गदर्शनाखाली हे रुग्णालय बालरोग, माता-शिशू काळजी आणि सुरक्षित प्रसूती अशा सेवांमध्ये अग्रगण्य राहिले आहे. समाजातील प्रत्येक घटकापर्यंत आरोग्यसेवा पोहोचावी या हेतूने राबविण्यात येणारी मोफत शिबिरे आणि सवलतीच्या दरातील उपचार यांमुळे हे रुग्णालय खऱ्या अर्थाने 'धन्वंतरीच्या सेवाव्रताने' प्रेरित झाल्याचे दिसून येते. आधुनिक वैद्यकीय शास्त्र आणि मानवी संवेदना यांचा सुरेख संगम साधत हे रुग्णालय मोशी परिसराचा एक भक्कम आधारस्तंभ ठरले आहे.





> "हा पुरस्कार म्हणजे केवळ माझा वैयक्तिक सन्मान नसून, आमच्या संपूर्ण 'विठ्ठल हॉस्पिटल' टीमने रात्रंदिवस घेतलेल्या कष्टांची आणि रुग्णसेवेप्रती असलेल्या निष्ठेची ही पावती आहे. वैद्यकीय क्षेत्रात काम करताना रुग्णांच्या चेहऱ्यावरील समाधान हाच आमचा खरा पुरस्कार असतो. आज मिळालेल्या या गौरवमुळे आमची सामाजिक जबाबदारी अधिक वाढली असून, भविष्यातही अत्याधुनिक आणि दर्जेदार आरोग्य सुविधा सर्वसामान्यांना परवडणाऱ्या दरात उपलब्ध करून देण्यासाठी आम्ही सदैव कटिबद्ध राहू. समाजाप्रती असलेले हे सेवाव्रत आम्ही अधिक जोमाने पुढे नेऊ."
>
> **- डॉ. भाग्यश्री लहाने-मुंडे**





# महिला उद्योजिका वंदना चौव्हाण यांना 'फेस ऑफ इन्स्पिरेशन' नारीशक्ती कार्यगौरव पुरस्कार प्रदान

## विद्युत क्षेत्रातील उत्तुंग कामगिरीचा गौरव, एक्सप्रेस मीडिया एंटरप्राइजेस आणि रमामंगल फाऊंडेशन यांच्या वतीने बहुमान प्रदान




**पिंपरी | प्रतिनिधी**

पुरुषांचे वर्चस्व असलेल्या इलेक्ट्रिकल क्षेत्रात आपल्या कतृत्वाचा ठसा उमटवणाऱ्या पिंपरी-चिंचवडमधील यशस्वी महिला उद्योजिका वंदना चौव्हाण यांना नुकताच मानाचा 'फेस ऑफ इन्स्पिरेशन' नारीशक्ती कार्यगौरव पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले. एक्सप्रेस मीडिया एंटरप्राइजेस आणि रमामंगल फाऊंडेशन यांच्या वतीने आयोजित एका दिमाखदार सोहळ्यात त्यांना हा बहुमान प्रदान करण्यात आला. यावेळी ज्येष्ठ अभिनेते मकरंद अनासपुरे, अॅल्युमिनियम मॅन ऑफ इंडिया अशी ख्याती असलेले सुप्रसिद्ध उद्योजक भरत गीते, खासदार श्रीरंग बारणे, महापौर रवी लांडगे, एक्सप्रेस मीडिया एंटरप्राइजेसच्या संचालिका मनिषा थोरात पिसाळ, वैभव थोरात, रमा मंगल फाऊंडेशन संचालक संतोष सौंदणकर कविता अल्हाट, सुलभा उबाळे, अनंत कोन्हाळे, सुनील काकडे, आदी मान्यवर उपस्थित होते.

1998 पासून या क्षेत्रात कार्यरत असलेल्या वंदना चौव्हाण यांनी २०१४ मध्ये 'मे. वैष्णवी इलेक्ट्रिकल सल्लागार' (VEC DESIGN STUDIO) या स्वतःच्या कंपनीची स्थापना केली. त्यांनी पिंपरी-चिंचवडमधील भक्ती-शक्ती उड्डाणपूल, शिंदेवस्ती रेल्वे उड्डाणपूल, बोपखेल उड्डाणपूल आणि सध्या चर्चेत असलेल्या अटलबिहारी वाजपेयी उद्यानातील (एलईडी गार्डन) विद्युत रोषणाईचे काम अत्यंत यशस्वीपणे पूर्ण केले आहे.

वंदना चौव्हाण यांच्या कार्याची व्याप्ती केवळ स्थानिक पातळीपुरती मर्यादित नसून, त्यांनी हरिद्वार येथील 'महाकुंभ मेळा २०२१' मध्येही विद्युत व्यवस्थेची जबाबदारी समर्थपणे सांभाळली होती. विशेष म्हणजे, छ. संभाजीनगर येथील 'जी-२०' परिषदेच्या निमित्ताने त्यांनी केलेल्या विद्युत रोषणाईची दखल खुद्द पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी घेतली असून, त्याबद्दल त्यांना विशेष पुरस्काराने गौरवण्यात आले. यासह मुंबई, नागपूर, कोल्हापूर अशा मोठ्या शहरांमध्येही त्यांनी आपल्या कामाची छाप पाडली असून, भारतातील पहिल्या अत्याधुनिक १३-डी तंत्रज्ञानावर आधारित ऐतिहासिक कलाकृती दालनाचे कामही त्यांच्या मार्गदर्शनाखाली पूर्ण झाले. याकरीता मा. मुख्यमंत्री याच्या हस्ते पुरस्कृत करण्यात आले. यापूर्वी त्यांना पिंपरी-चिंचवड अचिव्हर्स अवॉर्ड आणि ग्लोबल एमपावर्ड अवॉर्ड, यांसारख्या अनेक प्रतिष्ठित पुरस्कारांनी गौरवण्यात आले असुन सी ईन्स्पायर सारख्या जगभर प्रशिध्द मागझिन मध्ये जीवन प्रवास प्रकाशित झालेला आहे.

वंदना चौव्हाण यांनी आपल्या कष्टाने आणि जिद्दीने इलेक्ट्रिकल क्षेत्रात मिळवलेल्या या यशाचे सर्व स्तरांतून कौतुक होत आहे.

महिला उद्योजिका वंदना चौव्हाण यांना 'फेस ऑफ इन्स्पिरेशन' नारीशक्ती कार्यगौरव पुरस्कार प्रदान;

1998 पासून या क्षेत्रात कार्यरत असलेल्या वंदना चौव्हाण यांनी २०१४ मध्ये 'मे. वैष्णवी इलेक्ट्रिकल सल्लागार' (VEC DESIGN STUDIO) या स्वतःच्या कंपनीची स्थापना केली. त्यांनी पिंपरी-चिंचवडमधील भक्ती-शक्ती उड्डाणपूल, शिंदेवस्ती रेल्वे उड्डाणपूल, बोपखेल उड्डाणपूल आणि सध्या चर्चेत असलेल्या अटलबिहारी वाजपेयी उद्यानातील (एलईडी गार्डन) विद्युत रोषणाईचे काम अत्यंत यशस्वीपणे पूर्ण केले आहे.

वंदना चौव्हाण यांच्या कार्याची व्याप्ती केवळ स्थानिक पातळीपुरती मर्यादित नसून, त्यांनी हरिद्वार येथील 'महाकुंभ मेळा २०२१' मध्येही विद्युत व्यवस्थेची जबाबदारी समर्थपणे सांभाळली होती. विशेष म्हणजे, छ. संभाजीनगर येथील 'जी-२०' परिषदेच्या निमित्ताने त्यांनी केलेल्या विद्युत रोषणाईची दखल खुद्द पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी घेतली असून, त्याबद्दल त्यांना विशेष पुरस्काराने गौरवण्यात आले. यासह मुंबई, नागपूर, कोल्हापूर अशा मोठ्या शहरांमध्येही त्यांनी आपल्या कामाची छाप पाडली असून, भारतातील पहिल्या अत्याधुनिक १३-डी तंत्रज्ञानावर आधारित ऐतिहासिक कलाकृती दालनाचे कामही त्यांच्या मार्गदर्शनाखाली पूर्ण झाले. याकरीता मा. मुख्यमंत्री याच्या हस्ते पुरस्कृत करण्यात आले. यापूर्वी त्यांना पिंपरी-चिंचवड अचिव्हर्स अवॉर्ड आणि ग्लोबल एमपावर्ड अवॉर्ड, यांसारख्या अनेक प्रतिष्ठित पुरस्कारांनी गौरवण्यात आले असुन सी ईन्स्पायर सारख्या जगभर प्रशिध्द मागझिन मध्ये जीवन प्रवास प्रकाशित झालेला आहे.

वंदना चौव्हाण यांनी आपल्या कष्टाने आणि जिद्दीने इलेक्ट्रिकल क्षेत्रात मिळवलेल्या या यशाचे सर्व स्तरांतून कौतुक होत आहे.



> **आज या भव्य व्यासपीठावर उभं राहून एक गोष्ट ठामपणे सांगावीशी वाटते —प्रामाणिकपणे केलेल्या कामाला शेवटी न्याय मिळतोच!आज मिळालेला हा सन्मान...हा फक्त एक पुरस्कार नाही,तर प्रत्येक शंकेला दिलेलं ठोस उत्तर आहे...प्रत्येक कुशंकेवर उमटलेली एक ठाम सही आहे...हा सन्मान म्हणजे —निष्ठा, कष्ट आणि प्रामाणिकतेची मिळालेली खरी पावती आहे.मनिषाताई आणि त्यांच्या संपूर्ण टीमचे मनःपूर्वक आभार...हा विश्वास आणि हा सन्मान आयुष्यभर प्रेरणा देत राहील.**
>
> **- वंदना चौव्हाण, उद्योजिका**

### विद्युत क्षेत्रातील उत्तुंग कामगिरीचा गौरव

**» पुरुषांचे वर्चस्व असलेल्या इलेक्ट्रिकल क्षेत्रात आपल्या कतृत्वाचा ठसा उमटवणाऱ्या पिंपरी-चिंचवडमधील यशस्वी महिला उद्योजिका वंदना चौव्हाण यांना नुकताच मानाचा 'फेस ऑफ इन्स्पिरेशन' नारीशक्ती कार्यगौरव पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले. एक्सप्रेस मीडिया एंटरप्राइजेस आणि रमामंगल फाऊंडेशन यांच्या वतीने आयोजित एका दिमाखदार सोहळ्यात त्यांना हा बहुमान प्रदान करण्यात आला. यावेळी ज्येष्ठ अभिनेते मकरंद अनासपुरे, अॅल्युमिनियम मॅन ऑफ इंडिया अशी ख्याती असलेले सुप्रसिद्ध उद्योजक भरत गीते, खासदार श्रीरंग बारणे, महापौर रवी लांडगे, एक्सप्रेस मीडिया एंटरप्राइजेसच्या संचालिका मनिषा थोरात पिसाळ, वैभव थोरात, रमा मंगल फाऊंडेशन संचालक संतोष सौंदणकर कविता अल्हाट, सुलभा उबाळे, अनंत कोन्हाळे, सुनील काकडे, आदी मान्यवर उपस्थित होते.**

# मिळकतकर वसुलीत वेग; 10 दिवसांत 72 कोटींची भर

## 14.99 लाख बिलांपैकी 8.82 लाखांचे वाटप पूर्ण; 31 मेपूर्वी भरल्यास 10% पर्यंत सवलत

**पुणे | प्रतिनिधी**

महापालिकेकडून शहरातील मिळकतकरधारकांना यंदा पोस्टाच्या माध्यमातून बिले पाठविण्यात आली आहेत. आतापर्यंत १४ लाख ९९ हजार बिलांपैकी तब्बल आठ लाख ८२ हजार बिलांचे वाटप पूर्ण झाले आहे, तर या दहा दिवसांत सुमारे ७२ कोटींचा मिळकतकर महापालिकेच्या तिजोरीत जमा झाला आहे. महापालिकेकडून २०२६-२७ या आर्थिक वर्षासाठी सुमारे १४ लाख ९९ हजार मिळकतधारकांना मिळकतकराची बिले पाठविण्यात येणार आहेत.

प्रशासनाकडून ही बिले १ एप्रिलपासूनच नागरिकांना पालिकेच्या संकेतस्थळावर ऑनलाइन स्वरूपात देण्यात आली आहेत. याशिवाय ज्या मिळकतधारकांचे मोबाइल क्रमांक महापालिकेकडे नोंद आहेत, त्यांना मेसेजद्वारे बिलाची लिंक पाठविल्याने नागरिकांनी बिले भरण्यास सुरुवातही केली आहे. महापालिकेकडून दरवर्षीप्रमाणे ३१ मे पूर्वी मिळकतकर भरणाऱ्या नागरिकांना सर्वसाधारण करात ५ ते १० टक्के सवलत देण्यात येणार असून, जास्तीत जास्त नागरिकांनी याचा लाभ घेण्याचे आवाहन प्रशासनाने केले आहे. नागरिकांना वेळेत कर भरता यावा, या उद्देशाने महापालिकेची शहरातील कर भरणा केंद्रे सोमवार ते शनिवार सकाळी १० ते दुपारी ४ या कालावधीत सुरू ठेवली जाणार आहेत. नागरिकांनी करभरणा केंद्रासह ऑनलाइन माध्यमातूनही कर भरण्यास प्राधान्य द्यावे, असे आवाहन कर संकलन विभागाचे उपायुक्त रवी पवार यांनी केले आहे.

३१ मेपूर्वी मिळकतकर भरल्यास नागरिकांना ५ ते १० टक्के सवलत मिळणार आहे. यासाठी शहरातील कर भरणा केंद्रे सोमवार ते शनिवार सकाळी १० ते दुपारी ४ या वेळेत सुरू राहणार आहेत. ऑनलाइन माध्यमालाही प्राधान्य देण्याचे आवाहन उपायुक्त रवी पवार यांनी केले आहे.




### बिलांचे मोठ्या प्रमाणावर वाटप

» पुणे महापालिकेकडून २०२६-२७ या आर्थिक वर्षासाठी सुमारे १४ लाख ९९ हजार मिळकतकर बिले पाठविण्यात आली आहेत. त्यापैकी आतापर्यंत ८ लाख ८२ हजार बिलांचे वितरण पूर्ण झाले आहे. पोस्टाद्वारे तसेच ऑनलाइन माध्यमातून बिले उपलब्ध करून देण्यात आल्याने नागरिकांनी कर भरण्यास सुरुवात केली आहे.

### ७२ कोटींची वसुली

» केवळ दहा दिवसांत महापालिकेच्या तिजोरीत सुमारे ७२ कोटी रुपयांचा मिळकतकर जमा झाला आहे. मोबाईलवर मेसेजद्वारे बिलाची लिंक पाठविल्यामुळे नागरिकांना कर भरणे अधिक सुलभ झाले असून, वसुलीला गती मिळाली आहे.

### सवलतीचा लाभ घ्या

» ३१ मेपूर्वी मिळकतकर भरल्यास नागरिकांना ५ ते १० टक्के सवलत मिळणार आहे. यासाठी शहरातील कर भरणा केंद्रे सोमवार ते शनिवार सकाळी १० ते दुपारी ४ या वेळेत सुरू राहणार आहेत. ऑनलाइन माध्यमालाही प्राधान्य देण्याचे आवाहन उपायुक्त रवी पवार यांनी केले आहे.

# पुणे मेट्रोचा मास्टर प्लॅन जाहीर! 2030 पर्यंत सर्व मार्गिका पूर्ण होणार

## हिंजवडी-शिवाजीनगर मेट्रोमुळे वाढणारी गर्दी लक्षात घेता विद्यमान मार्गांवर डबे वाढवणार; महामेट्रोकडून अहवाल तयार.

**पुणे | प्रतिनिधी**

हिंजवडी-शिवाजीनगर मेट्रो सुरू झाल्यानंतर प्रवासी संख्येत वाढ अपेक्षित असल्याने आधीच्या दोन मार्गावरील डबे वाढवणार असल्याचे महामेट्रोचे व्यवस्थापकीय संचालक श्रावण हर्डीकर यांनी पत्रकार परिषदेत सांगितले. त्यासाठीचा अहवाल मेट्रो तयार करत असल्याचे ते म्हणाले. सध्या पिंपरी चिंचवड ते स्वारगेट, वनाझ ते रामवाडी मेट्रोचा दिवसाला २ लाखांच्या आसपास प्रवासी वापर करत आहेत.

त्यांसाठी सध्या तीन डबे वापरात आहे. हिंजवडी-शिवाजीनगर मेट्रो सुरू झाल्यावर प्रवासी संख्येत एक ते दीड लाखांची वाढ अपेक्षित आहे. मेट्रोला होणारी गर्दी पाहता विस्तारित मार्गिकांसाठी दोन टप्प्यात १२ आणि १५ गाड्या नव्याने दाखल होतील. सध्या दोन मार्गावर ३४ गाड्या चालू असून त्यांना १०२ डबे आहेत. तिसरा मार्ग आणि टप्पा दोनचा विचार करता अजून २७ गाड्या आणि एकूण ८१ डब्बे असतील.

विस्तार, नव्या मार्गिकांचे काम २०३० पर्यंत पूर्ण करण्याचे उद्दीष्ट आहे. खडकवासला-खराडी मार्ग नरवीर तानाजी मालुसरे रस्त्यावरून जाणार असून त्यानुसार या रस्त्यावर उड्डाणपूल उभारल्याचे त्यांनी सांगितले. शिवाजीनगर बसस्थानकासंदर्भात महामेट्रो आणि राज्य परिवहन महामंडळातील कराराचा अंतिम मसुदा तयार झाला असून त्यावर महामंडळाच्या बैठकीत चर्चा होईल.

त्याला मान्यता मिळाल्यानंतर एसटी स्थानकासाठी निविदा काढून तेथे एसटी स्थानकासह बस पार्किंग उभारले जाणार आहे. तसेच पीपीपी तत्त्वावर जागेचा विकास करण्यात येणार आहे.



### भविष्यातील प्रकल्प

» महामेट्रोने २०३० पर्यंत सर्व विस्तारकामे पूर्ण करण्याचे उद्दिष्ट ठेवले आहे. खडकवासला-खराडी मार्ग नरवीर तानाजी मालुसरे रस्त्यावरून जाणार असून त्यानुसार उड्डाणपूल उभारण्यात येणार आहे. शिवाजीनगर बसस्थानकासाठी महामेट्रो आणि राज्य परिवहन मंडळात करार अंतिम टप्प्यात असून, तेथे आधुनिक एसटी स्थानक आणि बस पार्किंग उभारण्याची योजना आहे.

### प्रवाशांना अधिक सुविधा देण्यावर भर

» महामेट्रोचे व्यवस्थापकीय संचालक श्रावण हर्डीकर यांनी सांगितले की, हिंजवडी-शिवाजीनगर मेट्रो सुरू झाल्यानंतर प्रवासी संख्येत मोठी वाढ अपेक्षित आहे. सध्या पिंपरी चिंचवड-स्वारगेट आणि वनाझ-रामवाडी या मार्गांवर दररोज सुमारे २ लाख प्रवासी प्रवास करतात. वाढत्या गर्दीचा विचार करून विद्यमान मार्गांवर अतिरिक्त डबे जोडण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. यासाठी सविस्तर अहवाल तयार केला जात असून प्रवाशांना अधिक सुविधा देण्यावर भर दिला जाणार आहे.

### मेट्रो विस्तार योजना

» हिंजवडी-शिवाजीनगर मार्ग सुरू झाल्यानंतर दररोज १ ते १.५ लाख प्रवाशांची वाढ होण्याचा अंदाज आहे. त्यामुळे दोन टप्प्यांत १२ आणि १५ अशा नव्या गाड्या ताफ्यात दाखल होणार आहेत. सध्या ३४ गाड्यांमधून १०२ डबे चालू आहेत. भविष्यात तिसऱ्या मार्गासह आणखी २७ गाड्या आणि ८१ डबे वाढवले जाणार आहेत. यामुळे प्रवासी सेवा अधिक सक्षम आणि जलद होणार आहे.